# महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

(संलग्न-अखिल भारतीय कबड्डी फेडरेशन - महाराष्ट्र ऑलिम्पीक असोसिएशन)

नोंदणी क्र.: एफ् ६२६ (मुंबई) व मुंबई २१/१९५६ जी. बी. बी. एस. डी.



कार्यालय : शिवाजी पार्क मैदान, वीर सावरकर मार्ग, दादर (प), मुंबई-४०००२८. संपर्क : २४४४८४९४

E-mail - maharashtra.kabaddi@gmail.com Web - www.maharashtrakabaddi.com



* आजीव अध्यक्ष *
श्री. शरद पवार

* अध्यक्ष *
श्री.अजित पवार

* कार्याध्यक्ष *
श्री. गजानन किर्तिकर

* उपाध्यक्ष *
श्री. सुनिल तटकरे
श्री. अशोक (भाई) जगताप
श्री. अमरसिंह पंडीत
श्री. दिनकर पाटील
श्री. शशिकांत गाडे
श्रीमती शंकुतला खटावकर
श्रीमती नेत्रा राजेशिर्के

* सरकार्यवाह *
अॅड. श्री. आस्वाद पाटील

* खजिनदार *
श्री. मंगल पांडे

* सहकार्यवाह *
श्री. रविंद्र देसाई
श्री. मोहन गायकवाड
श्री. मदन गायकवाड
श्री. महादेव साठे
श्री. मनोज पाटील
श्रीमती सय्यदा पटेल
श्रीमती स्मिता जाधव

* समिती सदस्य *
श्री. देवराम भोईर
श्री. बाबुराव चांदेरे
श्री. नितीन बरडे
श्री. मुज्जफर अलि सय्यद
श्रीमती लीना कांबळे


जावक क्रमांक : मराकअ

दिनांक : ०९/०६/२०२२

## किशोर व कुमार गट राज्य अजिंक्यपद निवड व चाचणी अटी व नियम

स्पर्धा आयोजक संस्थेने कमीत कमी ३ महिने आगाऊ लेखी पत्र देऊन कळविणे अनिवार्य राहील. राज्य असोसिएशनची समिती स्पर्धा स्थळी भेट देऊन आपला अहवाल राज्य असोसिएशनकडे सादर करतील. त्यानुसार राज्य असोसिएशन स्पर्धेबाबत निर्णय घेईल.

१. स्पर्धा आयोजित करणाऱ्या संस्थेला जिल्हा असोसिएशचे लेखी शिफारसपत्र सोबत जोडावे लागेल. स्पर्धा मान्यता शुल्क राज्य कबड्डी असोसिएशनच्या नियमानुसार भरणे अनिवार्य राहील. स्पर्धा मान्यता शुल्क भरल्याशिवाय मान्यता देण्यात येणार नाही.

२. स्पर्धेत सहभागी होणारे जिल्हा संघ व संघातील खेळाडूंची राज्य असोसिएशनच्या नियमानुसार ऑनलाईन खेळाडू नोंदणी असणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीकृत प्रवेशअर्जच स्विकारणयात येतील. प्रत्येक जिल्हा संघास प्रवेश शुल्क रू. ५००/– राज्य असोसिएशनच्यावतीने आकारण्यात येईल.

३. किशोर/किशोरी गट व कुमार/कुमारी गट या स्पर्धेत सहभागी झालेले निरिक्षक, पंच प्रमुख, सहाय्यक पंच प्रमुख, सामनाधिकारी, पदाधिकारी व विविध समित्या यांचा प्रवास भत्ता आणि दैनंदिन भत्ता नियमानुसार राज्य असोसिएशनच्यावतीने देण्यात येईल.

४. स्पर्धा भारतीय कबड्डी महासंघाच्या प्रचलीत नियमानुसार साखळी व बाद पध्दतीने खेळविल्या जातील.

५. व्यासपीठावरील बॅनरवर राज्य व जिल्हा संघटनेच्या मान्यतेचा उल्लेख असलाच पाहिजे.

६. स्पर्धेत सहभागी होणारे खेळाडू व जिल्हा निहाय संघांच्या कार्यवाहांची निवास व भोजन व्यवस्था संयोजकांना विनामुल्य करावी लागेल.

७. निवास व्यवस्था ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी दारे व खिडक्या यांची सोय असावी. खेळाडूंच्या निवासव्यवस्थे ठिकाणी विद्युत पुरवठा, मुबलक पाणी तसेच पुरेशी प्रसाधन गृहाची सोय असावी. त्या ठिकाणी सुरक्षा रक्षकाची व्यवस्था असावी.

८. स्पर्धेत सहभागी होणारे खेळाडू, सामनाधिकारी व पदाधिकारी यांची स्पर्धा कालावधीत सकाळ व सायंकाळ चहा नास्ता आणि दुपारी व रात्रीचे सात्विक भोजनाची व्यवस्था विनामुल्य करावी लागेल. शक्यतो खेळाडू, सामनाधिकारी व पदाधिकारी यांच्यासाठी वेगवेगळी भोजन व्यवस्था असावी.

९. स्पर्धा आयोजकांनी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंसाठी स्पर्धा कालावधीत व स्पर्धेच्या आदल्या दिवशी एखादा संघ आल्यास तसेच स्पर्धा संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी एखादा संघ राहणार असेल तर त्यांना सकाळचा चहा, नास्ता, दुपारचे भोजन, सायंकाळचा चहा आणि रात्रीची भोजन व्यवस्था विनामुल्य करावी लागेल.

१०. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या जिल्हा संघांचा संपूर्ण प्रवास खर्च संबधीत जिल्हा संघटना करेल. परंतु ज्या ठिकाणी रेल्वे सवलत उपलब्ध असेल अशा जिल्हा संघटनांना रेल्वे सवलत अर्ज राज्य असोसिएशनच्यावतीने देण्यात येतील.

११. स्पर्धेसाठी उत्कृष्ट दर्जाची सहा मातीची अथवा मॅटची सहा क्रीडांगणे योग्य व उत्तम दर्जाची असावीत. मॅटच्या क्रीडांगणावर स्पर्धा असल्यास मॅटच्या शुजची पुर्वकल्पना राज्य असोसिएशन जिल्हा असोसिएशनला

कार्यालय : शिवाजी पार्क मैदान, वीर सावरकर मार्ग, दादर (प), मुंबई-४०००२८. संपर्क : २४४४८४९४

E-mail - maharashtra.kabaddi@gmail.com Web - www.maharashtrakabaddi.com



★ आजीव अध्यक्ष ★
श्री. शरद पवार

★ अध्यक्ष ★
श्री.अजित पवार

★ कार्याध्यक्ष ★
श्री. गजानन किर्तिकर

★ उपाध्यक्ष ★
श्री. सुनिल तटकरे
श्री. अशोक (भाई) जगताप
श्री. अमरसिंह पंडीत
श्री. दिनकर पाटील
श्री. शशिकांत गाडे
श्रीमती शंकुतला खटावकर
श्रीमती नेत्रा राजेशिर्के

★ सरकार्यवाह ★
अँड. श्री. आस्वाद पाटील

★ खजिनदार ★
श्री. मंगल पांडे

★ सहकार्यवाह ★
श्री. रविंद्र देसाई
श्री. मोहन गायकवाड
श्री. मदन गायकवाड
श्री. महादेव साठे
श्री. मनोज पाटील
श्रीमती सय्यदा पटेल
श्रीमती स्मिता जाधव

★ समिती सदस्य ★
श्री. देवराम भोईर
श्री. बाबुराव चांदेरे
श्री. नितीन बरडे
श्री. मुज्जफर अलि सय्यद
श्रीमती लीना कांबळे


जावक क्रमांक : मराकअ

दिनांक : ०९/०६/२०२२

देईल. मॅटच्या क्रीडांगणावर शुजविना खेळता येणार नाही. उत्तम दर्जाची ध्वनीक्षेपकासह योग्य विद्युत पुरवठा असावा. प्रत्येक क्रीडांगणावर विद्युत गुणफलक व ३० सेकंद आणि ३री चढाई दर्शविणारी यंत्रणा असावी.

१२. निवासस्थान व क्रीडांगणावर पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था असावी. स्पर्धा कालावधीत क्रीडांगणावर पंच व अधिकारी यांच्यासाठी चहा व नास्त्याची व्यवस्था विनामुल्य करावी लागेल.

१३. खेळाडू व प्रेक्षकांना बसण्यासाठी स्वतंत्र गॅलरीची सोय असणे आवश्यक आहे. तसेच गणवेष बदलण्यासाठी स्वतंत्र सोय असावी.

१४. क्रीडांगणावर प्रथमोपचाराची व्यवस्था रूग्णवाहिकेसह असणे आवश्यक आहे.

१५. खेळाडू तसेच पुरूष / महिला प्रेक्षकांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची व्यवस्था असावी.

१६. मुख्य व्यावसपीठावर अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सरकार्यवाह, उपाध्यक्ष व खजिनदार यांच्यासाठी बैठक व्यवस्था असणे आवश्यक आहे. जिल्हा व राज्य असोसिएशनच्या इतर पदाधिकाऱ्यांना व्यासपीठावर बसण्याची व्यवस्था असावी.

१७. निरीक्षक व पंचप्रमुख यांना व्यासपीठावर बसण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी.

१८. राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या संघाचे सराव शिबीर संयोजकांना मॅटच्या मैदानावर आयोजित करावे लागेल अथवा शिबीराचा खर्च म्हणून रू. १,००,०००/– (एक लाख) राज्य संघटनेला द्यावे लागतील. सदर रक्कम स्पर्धा मान्यता शुल्क बरोबर भरणे आवश्यक आहे.

१९. सराव शिबीरातील खेळाडू, व्यवस्थापक, प्रशिक्षक, पदाधिकारी व निवड समिती सदस्य यांची चहा, नास्ता, भोजन, निवास व्यवस्था संयोजकांना विनामुल्य करावी लागेल.

२०. राज्य व जिल्हा असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची स्पर्धा आयोजन समिती व इतर समित्या स्थापन कराव्यात लागतील.

२१. खेळाडूंचे वजन पाहण्यासाठी दोन विद्युत वजनकाटे उपलब्ध करून द्यावे लागतील.

२२. विद्युत पुरवठा खंडीत होत असल्यास जनरेटरची व्यवस्था करावी लागेल.

२३. क्रीडांगणापासून निवास व्यवस्था दूर असल्यास खेळाडू, पंच, अधिकारी यांच्यासाठी वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून द्यावी लागेल.

२४. मैदानावर राज्य असोसिएशनच्या कार्यालयासाठी स्वतंत्र खोली असावी. त्यामध्ये कपाट, इंटरनेटसह संगणक, संगणक चालक असावा तसेच टेबल खुर्च्यांसह बसण्याची पुरेशी व्यवस्था असावी.

२५. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी येणारे खेळाडू, पंच व अधिकारी यांच्यासाठी स्पर्धा संपल्यावर परतीच्या प्रवासाच्यावेळी स्टेशन व एस.टी.स्टँड येथून त्यांना आणण्यासाठी व परत पोहचविण्यासाठी बस अथवा इतर वाहनांची सोय असावी.

आपला,

(अँड.आस्वाद पाटील)
सरकार्यवाह